**प्रेस नोट दिनांक १६/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**नागरिकाचे प्रामाणिक पणामुळे व खडक पोलीसांचे अथक प्रयत्नाअंती महिलेस तिचे हरविलेले रोख ९५०००/- व महत्वाचे कागदपत्रे २४ तासाचे आत महिलेस परत.**

-----------------ooo--------------

महिला नामे सौ. निलांबरी अशोक हरगुडे वय ३७ वर्षे, रा. वृंदावन सोसायटी नं. ०५, फ्लॅट नं. ५५, शंकरशेठ रोड पुणे ह्या दि. १५/०७/२०१९ रोजी रात्रौ १०.०० वा. चे सुमारास नेहरु रोडवरून त्यांचे प्लेझर मोपेड गाडीवरून राहते घरी जात असताना त्यांचे गाडीचे हॅण्डलला अडकविलेली एक काळे रंगाची पर्स त्यामध्ये ९५०००/- रूपये रोख रक्कम व इतर महत्वाचे कागदपत्रे असलेली पर्स ही कोठेतरी पडुन गहाळ झालेबाबत त्यांनी लोहियानगर पोलीस चौकीस कळविले होते.

सदरवेळी चौकीचे प्रभारी अधिकारी पोउपनि माने, चौकी अंमलदार सपाफौ लोखंडे, पोलीस हवालदार ५८५९ माळी, पोलीस नाईक लोहोमकर, बीट मार्शल कर्मचारी पो.शि. ७७७७ धोत्रे व पोशि पाण्डे यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करून सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करून सदर रकमेचा शोध घेत असताना नागरिक सुमित सुभाष वेळेकर वय २४ वर्षे, रा. १०४९ न्यु नाना पेठ, पुणे सद्या रा. अविष्कार एजन्सी, मानकर डोसाचेवर फ्लॅट नं. १०१, गंगाधाम चौक पुणे यांनी समक्ष लोहियानगर पोलीस चौकीस येवुन त्यांना सदरची पर्स ही नेहरू रोडवर सापडलेबाबत सांगितले त्यावरून सदर पर्सची पाहणी करून त्यामध्ये मिळुन आले कागदपत्रावरून वरील महिला निलांबरी हरगुडे यांना संपर्क करून त्यांना खात्री करून त्यांची पर्स व रोख रक्कम ९५०००/- रूपये व कागदपत्रे हे पोलीसांनी वरील इसम सुमित वेळेकर यांचेसमक्ष परत करण्यात आली आहे. सदर महिलेने व त्यांचे नातेवाईकांनी पोलीसांचे व इसम नामे सुमित सुभाष वेळेकर यांचे आभार व्यक्त केले आहेत.

